# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक : - ३१ डिसेंबर २०२४

---

जळगाव दि.३१ (प्रतिनीधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या मोबाईल सायन्स व्हॅनचा एरंडोल परिसरातील शालेय विद्यार्थ्यांनी लाभ घेतला.

दि. २७ व २८ डिसेंबर रोजी के.डी.पाटील इंग्रजी माध्यम शाळा, जिजामाता हायस्कुल एरंडोल तसेच बोरगाव आश्रम शाळा,धारणगाव, सोनबर्डी आश्रम शाळा आणि सर्वज्ञ माध्यमिक विद्यालय बोरगाव येथे ही मोबाईल सायन्स व्हॅन विद्यार्थ्यांना पाहण्यासाठी नेण्यात आली. विद्यार्थ्यांनी या व्हॅनमधील विज्ञान प्रात्यक्षीकांची पहाणी केली. अशी माहिती समन्वयक डॉ.एस.एस.घोष यांनी दिली. या उपक्रमाचे नेतृत्व राजू आमले यांनी केले. मयुर बंदे, ऋषीकेश चौधरी, गौरव पाटील, अक्षय सैदाणे या विद्यार्थ्यांनी शालेय विद्यार्थ्यांना माहिती दिली.

तीनही जिल्ह्यातील ज्या शाळांना या मोबाईल सायन्स व्हॅनचा लाभ घ्यायचा असेल त्यांनी विद्यापीठाच्या राजीव गांधी विज्ञान आणि तंत्रज्ञान आयोग केंद्राचे समन्वयक डॉ. घोष यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन विद्यापीठाच्या वतीने करण्यात आले आहे.

बातमी क्रमांक २

जळगाव दि.३१ (प्रतिनीधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ आणि शिकाऊ प्रशिक्षण मंडळ, पश्चिम विभाग, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठात राष्ट्रीय शिकाऊ प्रशिक्षण योजनेची अंमलबजावणी या विषयावर कार्यशाळा घेण्यात आली.

या कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरु प्रा.एस.टी.इंगळे होते. यावेळी समन्वयक व नवोपक्रम आणि नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ.राजेश जवळेकर, निखिल गांगडे, प्राचार्य डॉ.सुहास गाजरे, डॉ.प्रिती अग्रवाल यांच्यासह विद्यापीठातील प्रशाळा व जळगाव जिल्हयातील प्राचार्य / संचालक उपस्थित होते.

यावेळी बोलतांना निखिल गांगडे यांनी या कार्यक्रमाचा उद्देश रोजगार क्षमता वाढविण्याचा असुन बिगर तांत्रीक पदवीधर/पदवीकाधारकांसाठी सहामहीने ते तीन वर्षांच्या कालावधीकरीता व तांत्रीक पदवीधर / पदवीकाधारकांसाठी १ वर्षांच्या कालावधीसाठी विद्यावेतन दिले जाणार आहे. उत्तीर्ण झाल्यापासून ५ वर्षाच्या आतील विद्यार्थ्यांना यात सहभागी होता येणार आहे. अशी माहिती

त्यांनी दिली. प्रास्ताविक प्लेसमेंट ऑफिसर सोनाली दायमा यांनी केले. एकुण ६७ जण या कार्यशाळेला उपस्थित होते.

बातमी क्रमांक - ३

जळगाव दि.३१ (प्रतिनीधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या आंतरविद्या शाखा प्रशाळेतील शिक्षणशास्त्र विभागाच्या वतीने पीएच.डी. विभागाच्या वतीने प्रवेश पुर्व परीक्षेच्या पहिल्या पेपरची २ दिवसीय ऑनलाईन कार्यशाळा घेण्यात आली.

विभागप्रमुख डॉ.मनिषा इंदाणी, संतोष खिराडे यांनी मार्गदर्शन केले. महाराष्ट्राच्या विविध जिल्ह्यातुन १०० विद्यार्थ्यांनी यात भाग घेतला. संदीप वाघ, जयेश पाटील यांनी समन्वयक व तांत्रिक सहाय्यक म्हणून काम पाहिले. डॉ. स्वाती तायडे, डॉ.रणजित पारधे यांनी सहकार्य केले.

---

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

डॉ.सुनील पाटील

जनसंपर्क अधिकारी